चदिनांक ०३.०९.२०२५ रोजी तिवसा, जि. अमरावती येथे मृतक हरीष रामकृष्ण आमले शेतकरी आत्महत्या प्रकरणात कुटूंबियांची भेट





दिनांक ०३.०९.२०२५ रोजी मोझरी, ता. तिवसा, जि. अमरावती येथे गुरूदास लक्ष्मण ढवले शेतकरी आत्महत्या प्रकरणात कुटूंबियांची भेट





दिनांक ०३.०९.२०२५ रोजी मोझरी, ता. तिवसा, जि. अमरावती येथे विजय चोपकर शेतकरी आत्महत्या प्रकरणात कुटूंबियांची भेट





**दिनांक ०३.०९.२०२५ रोजी मोझरी, ता. तिवसा, जि. अमरावती येथे सुभाष देशमुख शेतकरी आत्महत्या प्रकरणात कुटूंबियांची भेट**



नवराष्ट्र
www.navarashtra.com

# आत्महत्याग्रस्त कुटुंबाचे ॲड. हेलोंडेकडून सांत्वन

## तिवसा तालुक्यातील शेतकऱ्यांच्या प्रश्नांवर चर्चा



**तिवसा** (ता.प्र.) : कै. वसंतराव नाईक शेती स्वावलंबन मिशनचे अध्यक्ष ॲड. निलेश हेलोंडे पाटील यांनी बुधवारी (दि. ३) तालुक्याचा दौरा करून शेतकऱ्यांच्या प्रश्नांचा आढावा घेतला.

या दौऱ्यात वाढत्या शेतकरी आत्महत्या, शासकीय जमिनीवर चारा लागवड तसेच शेतकऱ्यांच्या इतर समस्यांवर सविस्तर चर्चा झाली. ॲड. हेलोंडे पाटील यांनी तिवसा येथील आत्महत्याग्रस्त शेतकरी हरिष रामकृष्ण आमले यांच्या कुटुंबास भेट देऊन त्यांच्या समस्या जाणून घेतल्यात. हरिष आमले यांनी गळफास घेऊन आत्महत्या केली होती. त्यांच्या कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला आहे. या कुटुंबाला शैक्षणिक व सामाजिक पातळीवर मदतीचे आश्वासन त्यांनी दिले. त्यानंतर मोझरी येथील आत्महत्याग्रस्त शेतकरी विजय आनंद चोपकर, दिनेश माणिक शेळके व गुलदास लक्ष्मण ढेवले यांच्या घरी जाऊनही त्यांनी शोकाकुल कुटुंबीयांना धीर दिला. या दौऱ्यात तिवसा तहसीलदार डॉ. मयूर कळसे, गट विकास अधिकारी अभिषेक कासोदे, नायब तहसीलदार आशिष नागरे, सार्वजनिक बांधकाम विभागाचे अभियंता बोरसे, कृषी व पशुसंवर्धन विभागाचे अधिकारी, महिला व बाल विकास अधिकारी तसेच संबंधित गावांचे सरपंच उपस्थित होते. शेतकऱ्यांचे प्रश्न प्रत्यक्ष ऐकून घेऊन शासन पातळीवर ठोस उपाययोजना करण्याचे आश्वासन ॲड. निलेश हेलोंडे पाटील यांनी दिले.

Amravati Plus Edition
Sep 05, 2025 Page No. 4
Powered by: Navarashtra.com

तरुण भारत
Paschim Vidarbha | 2025-09-05 | Page- 14
epaper.tarunbharat.net

# आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबीयांना धीर

## ॲड. नीलेश हेलोंडे पोहोचले भेटीला

## अधिकाऱ्यांशी चार लागवडीवर चर्चा



शेतकरी कुटुंबाशी चर्चा करताना ॲड. हेलोंडे व अधिकारी

◆ तिवसा, ४ सप्टेंबर

कै. वसंतराव नाईक शेती स्वावलंबन मिशनचे अध्यक्ष ॲड. नीलेश हेलोंडे पाटील यांनी बुधवार, ३ सप्टेंबर रोजी तिवसा तालुक्याचा दौरा करून शेतकऱ्यांच्या प्रश्नांचा आढावा घेतला.

यावेळी तालुक्यातील वाढत्या शेतकरी आत्महत्या, शासकीय जमिनीवर चारा लागवड तसेच शेतकऱ्यांच्या समस्यांवर त्यांनी सविस्तर चर्चा केली. तिवसा येथील आत्महत्याग्रस्त शेतकरी हरीश रामकृष्ण आमले यांच्या कुटुंबास भेट देण्यात आली. हरीश आमले यांनी १८ मार्च रोजी गळफास घेऊन आत्महत्या केली होती. त्यांच्या निधनाने पत्नी ज्योती हरीश आमले (वय ३३) व दोन लहान मुली स्नेहा (वय ११) व आदिती (वय ७) यांच्यावर दुःखाचा डोंगर कोसळला. ॲड. हेलोंडे यांनी त्यांचे दुःख जाणून घेतले व शेतकऱ्यांच्या मुलांना शैक्षणिक व सामाजिक पातळीवर मदतीचे आश्वासन दिले. त्यानंतर मोझरी येथील आत्महत्याग्रस्त शेतकरी विजय आनंद चोपकर, दिनेश माणिक शेळके व गुलदास लक्ष्मण ढेवले यांच्या घरीही जाऊन त्यांनी शोकाकूल कुटुंबीयांना धीर दिला.

या दौऱ्यात तिवसाचे तहसीलदार डॉ. मयूर कळसे, गटविकास अधिकारी अभिषेक कासोदे, नायब तहसीलदार आशिष नागरे, सार्वजनिक बांधकाम विभागाचे अभियंता बोरसे, कृषी विभागाचे अधिकारी, पशुसंवर्धन अधिकारी तसेच महिला व बालविकास अधिकारी उपस्थित होते. सोबतच संबंधित गावचे सरपंच सुद्धा उपस्थित होते.

शेतकऱ्यांचे प्रश्न प्रत्यक्ष ऐकून घेऊन शासन पातळीवर ठोस उपाययोजना करण्याचे आश्वासन ॲड. नीलेश हेलोंडे पाटील यांनी दिले. ◀(तभा वृत्तसेवा)

Powered by Bharati Web

# नीलेश हेलोंडे यांची आत्महत्याग्रस्त कुटुंबांना भेट

**लोकमत न्यूज नेटवर्क**



**तिवसा :** वसंतराव नाईक शेती स्वावलंबन मिशनचे अध्यक्ष ॲड. नीलेश हेलोंडे पाटील यांनी अमरावती दौऱ्यावर बुधवारी तालुक्यातील आत्महत्याग्रस्त कुटुंबांना भेटी दिल्या.

तिवसा येथील हरीश आमले, मोझरी येथील विजय चोपकर, दिनेश शेळके व गुरुदास ढेवले या शेतकऱ्यांनी आत्महत्या केली. त्यांच्या पश्चात कुटुंबीयांशी घरी जाऊन ॲड. नीलेश हेलोंडे यांनी चर्चा केली. आत्महत्याग्रस्त कुटुंबांना शासनाकडून विविध योजनांचा लाभ देण्यात येतो. तालुक्यातील अशा कुटुंबांना संबंधित योजनांचा लाभ मिळतो की नाही, याची त्यांनी माहिती जाणून घेतली. जे कुटुंब शासकीय योजनांपासून वंचित असेल, त्यांना लवकरात लवकर योजनांचा लाभ देण्यात यावे, असे शासकीय यंत्रणेला निर्देश दिले. याप्रसंगी तहसीलदार डॉ. मयूर कळसे, गटविकास अधिकारी अभिषेक कासोदे, नायब तहसीलदार आशिष नागरेंसह कृषी, पशुसंवर्धन, महिला व बाल विकास विभागाचे अधिकारी उपस्थित होते.

PostaReg.No.:AMT/RNP/533/2023-25 RNI.NO.MAHMAR/2022/83159

सांध्यदैनिक

**वरुड केसरी**

संपादक : प्रविण वसंतराव सावरकर, मो. ९८६०७३६१४२ ■ वरुड ■ बुधवार, ३ सप्टेंबर २०२५ ■ वर्ष ३ रे ■ अंक १८५ ■ पृष्ट ६ ■ मूल्य ४ रु. सहसंपादक : निखील बावणे

# डॉ. निलेश हेलोडे पाटील यांचा अकोला जिल्हा दौरा

## शेती विकास, जलसंधारण व पशुपालन या विषयांचा आढावा

**वरुड केसरी/अकोला (प्रतिनिधी)–** कै. वसंतराव नाईक शेती स्वावलंबन मिशन, महाराष्ट्र राज्याचे अध्यक्ष (राज्यमंत्री दर्जा) डॉ. निलेश हेलोडे पाटील हे दिनांक ०४ सप्टेंबर २०२५ रोजी अकोला जिल्ह्याच्या दौऱ्यावर येत असून विविध विकासात्मक उपक्रमांचा आढावा घेणार आहेत.



कार्यक्रम पुढीलप्रमाणे–

सकाळी १०.०० वा. : काटोल येथून अमरावतीकडे प्रयाण दुपारी १२.३० वा. : अमरावती येथे आगमन, विशेष आयुक्त कार्यालयास भेट व कार्याचा आढावा दुपारी १.३० वा. : डॉ. पं. देशमुख कृषी विद्यापीठ, अकोला येथे आगमन व प्रत्यक्ष पाहणी

कृषी विद्यापीठात

१. चार पिक पद्धती

२. पशुपालन

३. जलसंधारण

४. शेतीतील नवनवीन तंत्रज्ञान

या विषयांवरील कार्यप्रगतीची माहिती घेऊन डॉ. पाटील हे प्रत्यक्ष स्थितीचा आढावा घेणार आहेत. यानंतर कृषी विद्यापीठातील विभाग प्रमुख, कुलगुरु व प्राध्यापक मंडळींसोबत बैठक होऊन शेती विकास, जलसंधारण आणि पशुपालन क्षेत्रातील उपाययोजना व नियोजनावर सविस्तर चर्चा होणार आहे. दौऱ्यानंतर सायंकाळी डॉ. निलेश हेलोडे पाटील अमरावती मार्गे काटोलला परतणार असल्याचे जनसंपर्क कार्यालयातून कळविण्यात आले आहे.

दिनांक ०४.०९.२०२५ रोजी अकोला येथे मा. कुलगुरु, डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ यांना विद्यापीठाचे शेतजमीनीवर चारा लागवड करण्यासंबंधी निवेदन देताना मा. अध्यक्ष महोदय



दिनांक ०४.०९.२०२५ रोजी अकोला येथे डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ येथील गांडूळ खत निर्मिती प्रकल्पास भेट व पाहणी







दिनांक ०४.०९.२०२५ रोजी अकोला येथे डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ येथील कॅक्टस गार्डनला भेट व पाहणी





दिनांक ०४.०९.२०२५ रोजी अकोला येथे डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ येथील वनस्पती जैवतंत्रज्ञान उत्कृष्टता केंद्रास भेट व पाहणी






दिनांक ०४.०९.२०२५ रोजी अकोला येथे डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ येथील डॉ. पंजाबराव देशमुख स्मृती केंद्रास भेट व पाहणी





**दिनांक ०४.०९.२०२५ रोजी अकोला येथे डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ येथील संत्रा लागवड प्रकल्पास भेट व पाहणी**





दिनांक ०४.०९.२०२५ रोजी अकोला येथे डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ येथील रेशीम प्रकल्पास भेट व पाहणी





**दिनांक ०४.०९.२०२५ रोजी अकोला येथे डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ येथील कृषि प्रक्रिया केंद्रास भेट व पाहणी**





दिनांक ०४.०९.२०२५ रोजी अकोला येथे डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ येथील कृषी शास्त्रज्ञ यांचे सोबत बैठक व चर्चा





# डॉ पंजाबराव कृषि विद्यापीठाचे विकसित तंत्रज्ञान प्रत्येक शेतकऱ्यांपर्यंत पोहचले पाहिजे

**शेतकरी वाचला तरच देश वाचेल!**

**शेतकऱ्यांचे आत्महत्या थांबविण्यासाठी कृषी वैज्ञानिक सहयोग करावा**

**डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ, अकोला येथे ॲड .निलेश हेलोंडे पाटील यांचे प्रतिपादन**

**कृषि संशोधन गावोगावी पोहोचविण्याची गरज अधोरेखित '' शेतकऱ्यांसाठी नवे तंत्रज्ञान, बियाणे व पूरक व्यवसायांचा खजिना**





**वरुड केसरी / अकोला-** कृषी हा भारतीय अर्थव्यवस्थेचा कणा असून शेतकऱ्याला वाचवणे म्हणजेच देशाला वाचवणे होय, शेतकरी व शेती समृद्ध करायची असेल तर कृषी वैज्ञानिकांचे संशोधित संशोधनाची माहिती गावोगावचे शेतकऱ्यांपर्यंत पोहोचविण्यासाठी कृषी विभाग,जन प्रतिनिधी, कृषी मंडळांनीही प्रयत्न करावे असे प्रतिपादन कै. वसंतराव नाईक संस्था चे अध्यक्ष तथा राज्य मंत्री दर्जाचे एड. निलेश हेलोंडे पाटील यांनी केले. ते ५ सप्टेंबर रोजी डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ, अकोला येथे झालेल्या मार्गदर्शन बैठकीत बोलत होते.

या वेळी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. शरद गडाख, विविध विभागांचे संचालक, अधिष्ठाता, कृषी वैज्ञानिक, संशोधक, कुलसचिव तसेच प्रगतिशील शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते. शेतकऱ्यांच्या आत्महत्यांना अटकाव करण्यासाठी विज्ञानाधारित शेती गरजेचीवसंतराव नाईक स्वावलंबन मिशन अध्यक्ष एड. निलेश हेलोंडे पाटील चिकित्सक वृत्ती, अविरत प्रयत्न, विज्ञान व तंत्रज्ञान, सूक्ष्म परीक्षण, प्रशिक्षण आणि संशोधन या माध्यमातून कृषीचा मार्ग अधिक उज्वल होऊ शकतो. कमी खर्चाचे आणि अधिक उत्पादन देणारे शाश्वत तंत्रज्ञान गावोगावी शेतकऱ्यांच्या बांधापर्यंत पोहोचले पाहिजे. त्याद्वारे शेतकरी आत्महत्या थांबविण्यास निश्चित मदत होईल.

त्यांनी पुढे सांगितले की, शेतकऱ्यांशी सुसंवाद आणि समन्वय साधून विद्यापीठ व शासनाच्या विविध योजनांचा प्रसार करणे अत्यावश्यक आहे. महिलांना अधिक उत्पन्न, तरुणांना रोजगार, गोपालकांना व्यावसायिक संधी व शेतकऱ्यांना उत्पादनवाढ यासाठी विद्यापीठाचे उपक्रम खूप महत्वाचे आहेत. कुलगुरू डॉ. शरद गडाख यांनी सांगितले, पी.के.व्ही. अकोला येथे नवनवीन संशोधनाधारित वाण विकसित होत आहेत. या वाणांचा लाभ शेतकऱ्यांनी घेतल्यास शाश्वत शेतीचा मार्ग खुला होईल. परंतु संशोधन गावोगावी पोहोचविण्यासाठी शासन, प्रशासन आणि शेतकरी या तिन्ही घटकांनी एकत्रितपणे प्रयत्न करणे आवश्यक आहे.. कृषी शास्त्रज्ञांची रिक्त पदांची पदपूर्ती करावी. शेती व शेतकरी समृद्ध साठी कृषी वैज्ञानिकांच्या कृषी संशोधनाची कारच गरज आहे. मात्र कृषी विकासासाठी प्रख्यात डॉ पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठात कृषी वैज्ञानिकांचे बरेच (६५%)पद रिक्त आहेत. यामुळे सध्या स्थितीत आपल्या कामगिरीवर असल्याने वैज्ञानिकांवर बऱ्याच प्रमाणात कामाचा ताण वाढत आहे. राज्य सरकारने याकडे लक्ष द्यावे व या करिता वसंतराव नाईक स्वावलंबन मिशन चे अध्यक्ष (राज मंत्री दर्जा) एड निलेश हेलोंडे पाटील यांनी या प्रकरणी शासनदरबारी पाठपुरावा करावा असे आवाहन ही कुलगुरू डॉ शरद गडाख यांनी या प्रसंगी केले. संशोधनाची ठळक वैशिष्ट्ये व शिफारसी

१. बियाणे तंत्रज्ञान संशोधन विभागाच्या शिफारसी

उच्च उत्पादनक्षम वाण विकसित करून शेतकऱ्यांना उपलब्ध करून देणे.

बियाणे उत्पादन करताना योग्य अंतर, पेरणीची पद्धत, स्वच्छता व प्रमाणित तंत्रज्ञान वापरणे.

**बियाणे मानके व गुणवत्तेची काटेकोर अंमलबजावणी.**

२. माती परीक्षण व अन्नद्रव्य व्यवस्थापन माती परीक्षणाद्वारे पिकांना आवश्यक असलेली अन्नद्रव्ये ओळखणे.नत्र, स्फुरद, पालाश यांची संतुलित मात्रा पिकांना देणे.

कमतरतेमुळे पानांचा रंग बदलणे, वाढ खुंटणे, फुलगळ होणे यांसारखी लक्षणे आढळतात. यावर केलेल उपाय करणे महत्वाचे.

३. सेंद्रिय व नैसर्गिक शेती व्यवस्थापन

गांडूळ खत, ढैंचा, बोरू यांचा वापर करून जमिनीची सुपीकता वाढवणे.

सेंद्रिय कपाशी लागवड तंत्रज्ञानाचा अवलंब.नैसर्गिक शेतीसाठी दशपर्णी अर्क, जीवामृत, घनजीवामृत यांसारख्या निविष्ठांचा वापर.

४. भाजीपाला पिके

मिरची, कांदा, भेंडी, वांगी, टोमॅटो, फुलकोबी, पानकोबी, लसूण, टरबुज, खरबुज, हळद, आले यांचे वैज्ञानिक लागवड तंत्र.ओवा, सोप, कोथिंबीर, जिरे यांसारखी मसाला पिके विदर्भात फायदेशीर.महिनावारी भाजीपाला लागवडीचे वेळापत्रक तयार करून शेतकऱ्यांनी त्यानुसार काम करावे.रोग व किड व्यवस्थापनासाठी जैविक कीटकनाशके वापरण्यावर भर.

५. फळझाडे व बागायती पिके

पेरू, आंबा, डाळिंब, पपई यांसारख्या कोरडवाहू फळझाडांची लागवड तंत्र. फळझाडांसाठी संतुलित खत व्यवस्थापन. किडी व रोगांवर एकात्मिक व्यवस्थापन (खड्डा) तंत्राचा अवलंब.

६. फुलशेती- गुलाब, शेवंती, झेंडू, ॲस्टर, निशिगंध, मोगरा, ग्लॅडिओलस यांची लागवड तंत्र. हरितगृह व शेडनेट तंत्रज्ञानाद्वारे निर्यातक्षम फुलशेतीचा प्रसार.

आधुनिक हायड्रोपोनिक्स तंत्रज्ञान वापरून मर्यादित जमिनीत मोठ्या प्रमाणावर उत्पादन.

७. औषधी व सुगंधी वनस्पती लेमनग्रास, पुदिना, तुळस, अश्वगंधा यांसारख्या वनस्पतींमधून औषधी व सुगंधी तेल उत्पादन.आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत मोठी मागणी असल्याने शेतकऱ्यांसाठी पूरक उत्पन्नाचा स्त्रोत.

८. कृषि अभियांत्रिकी व जल व्यवस्थापन- मृद व जलसंधारण पद्धती इ कंटूर बंधारे, नाळपात्रे, बंधारे. ठिबक व तुषार सिंचनाद्वारे पाण्याची बचत. पीडीकेव्हीने विकसित केलेले सौर लाईट इन्सेक्ट ट्रॅप शेतकऱ्यांना मोठा फायदा देत आहे. सौर ऊर्जा, जैववायू व बायोगॅसचा वापर करून शेतकऱ्यांचा खर्च कमी करणे.

९. पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय- गाई व म्हशींच्या सुधारित जाती व त्यांचे फायदे चारा पिके व मुरघास तंत्रज्ञानाद्वारे जनावरांचे पोषण. कृत्रिम रेतन तंत्रज्ञानामुळे उत्पादनक्षम जनावरांची वाढ. औषधी वनस्पतींचा वापर करून जनावरांचे आरोग्य सुधार.

१०. कृषिपूरक व्यवसाय- अळिंबी शेती, मत्स्यपालन, कुक्कुटपालन, ससेपालन यांसारखे व्यवसाय ग्रामीण तरुणांना रोजगार देऊ शकतात. तुती लागवडीसह रेशीम शेती उद्योग ग्रामीण भागात उत्पन्नाचे नवे दालन उघडतो.

११. शेतीचे अर्थशास्त्र- शेतकऱ्यांनी ताळेबंद ठेवणे, खर्चाचे नियोजन करणे व बाजारपेठेचा अभ्यास करणे आवश्यक. विद्यापीठाने दिलेल्या प्रशिक्षणानुसार शेतकऱ्यांनी आर्थिक साक्षरतेवर भर दिला पाहिजे.

विदर्भातील सांख्यिकी माहिती

महाराष्ट्राच्या कृषी क्षेत्रात विदर्भाचे योगदान महत्वाचे. जमीन वापर, ओलीत क्षेत्र, सरासरी जमिनीचे आकारमान या बाबतीत आव्हाने. जिल्हानिहाय पशुधन, हवामान, मातीचे प्रकार वेगवेगळे असल्याने संशोधनाधारित उपाययोजना गरजेच्या. स्वंय रोजगारासाठी कृषि विद्यापीठाचे तंत्रज्ञान -कृ.उ.बा.समित्यांनी पुढाकार घ्यावा विदर्भातील कृषी उत्पन्न बाजार समित्यांनी आप आप आपल्या भागातील युवा शेतकरी व बेरोजगार युवकांना रोजगार उपलब्ध करून रोजगारक्षम बनविण्यासाठी डॉ पंजाबराव देशमुख कृषी महाविद्यालय विद्यापीठाकडून विकसित केलेले तंत्रज्ञानाचा उपयोग करून घेतला जाऊ शकतो. यात कचरा शुष्कक,प कृ वि मिनी दाल मिल संयत्र,मिरची बीज निष्कासन यंत्र,बाष्पकीय शीतक साठवन गृह,संत्रा, फळभाज्या साठवण,सीताफळ गरापासून बीज वेगळे करण्याचे यंत्र,गव्हांकुर भुकटी यंत्र,पशु खाद्य निर्मिती यंत्र,फळ प्रतवारी यंत्र, तात्पुरते धान्य झाकणे आवरण, सोयाबीन मधिल कचरा,खडे निष्कारण यंत्र,तूर चांगली भरडण विकारांची पूर्व प्रक्रिया, हिरव्या शेंगा सोलणी यंत्र,हिरवा हरबरा गाठे तोडणी यंत्र,या प्रकारे एकूण३६प्रकार पकृवि अकोला चे वतिने विकसित केले आहे याचा लाभ शेतकऱ्यांना मिळावा या करिता राज्य सरकार चे पणन मंत्रालयाने विदर्भातील कृषी उत्पन्न बाजार समितीच्या मार्फत शेतकऱ्यांना याबाबत जनजागृती व संयंत्राचे उपयोग कसे करावे या करीता शेतकऱ्यांना प कृ वि अकोला येथे भेटी देण्यासाठी शिवार फेरी घेऊन संयंत्र उपलब्ध करून देण्यात यावी. अशी सुचना वसंतराव नाईक स्वावलंबन मिशन अध्यक्ष एड निलेश हेलोंडे पाटील यांनी केली आहे. या मार्गदर्शन बैठकीत उपस्थित शेतकऱ्यांनी ही वरिल माहिती शेतकऱ्यांना मिळाली तरशेतकऱ्यांच्या अडचणी, आत्महत्यांची समस्या आणि उत्पादनवाढ यावर एकमेव उपाय म्हणजे कृषी संशोधन गावोगावी पोहोचविणे आणि शेतकऱ्यांनी ते अंगीकारणे असे होईल. या करिता विशेषत: कृ.उ.बा.समित्यांचे पदाधिकारी यांनी लक्ष दिलं पाहिजे असे उपस्थित शेतकऱ्यांनी ही आपले मत मांडले.

---



# युवा किसानों के स्व-रोजगार के लिए कृषि विश्वविद्यालय की तकनीक का उपयोग करें – एड. निलेश हेलोंडे पाटील

## > विदर्भ की कृषि उपज मंडियों को आगे आना होगा

## > युवाओं और महिलाओं को मिलेगा रोजगार का नया मार्ग

काटोल.

विदर्भ क्षेत्र के किसानों, बेरोजगार युवाओं और महिलाओं को आर्थिक व सामाजिक रूप से सक्षम बनाने के लिए कृषि विश्वविद्यालय की तकनीक और मशीनों को सीधे किसानों तक पहुँचाने की आवश्यकता है। यह कार्य कृषि उपज मंडियों के माध्यम से किया जाना चाहिए। ऐसा आवाहन वसंतराव नाईक स्वावलंबन मिशन के अध्यक्ष (राज्यमंत्री दर्जा) एड. निलेश हेलोंडे पाटील ने किया।



डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विश्वविद्यालय, अकोला द्वारा किसानों के लिए अब तक 36 प्रकार की तकनीक और मशीनें विकसित की गई है। इनमें कचरा शुष्कक, मिनी दाल मिल संयंत्र, मिर्च बीज निष्कासन यंत्र, बाष्पीय शीतक भंडारण गृह, फल-सब्जी भंडारण तकनीक, सीताफल से बीज अलग करने की मशीन, गेहूँ अंकुर पाउडर निर्माण यंत्र, पशु आहार निर्माण यंत्र, फल छंटाई यंत्र, सोयाबीन से कचरा व कंकड़ निकालने की मशीन, हरे फली छिलने और हरा चना गाठे तोड़ने की मशीन आदि प्रमुख है।

इन तकनीकों के इस्तेमाल से न केवल किसानों की उत्पादन क्षमता में वृद्धि होगी बल्कि युवाओं और महिलाओं के लिए स्वरोजगार के नए अवसर भी खुलेंगे।



**महिलाओं के सशक्तिकरण पर जोर :** बैठक में किसानों ने सुझाव दिया कि कृषि उपज मंडियों को इन तकनीकों के प्रति जागरूकता फैलाने के लिए शिवार फेरी और प्रात्यक्षिक कार्यक्रम आयोजित करने चाहिए। इससे महिलाएँ घर पर ही फल-सब्जी प्रसंस्करण, धान्य प्रसंस्करण व पशु आहार निर्माण जैसे कार्य कर आत्मनिर्भर बन सकेंगी।





**अनुसंधान गाँव-गाँव तक पहुँचना जरूरी :** किसानों की आत्महत्या और उत्पादन संकट का स्थायी समाधान तभी संभव है जब कृषि विश्वविद्यालय का शोध व तकनीक गाँव-गाँव तक पहुँचे और किसान इसे अपनाएँ। बैठक से यही संदेश सामने आया।

इस अवसर पर एड. निलेश हेलोंडे पाटील ने जोर देकर कहा – "किसान बचेगा तो ही देश बचेगा।" : उन्होंने कृषि वैज्ञानिकों और कुलपति डॉ. शरद गडाख से आग्रह किया कि हर स्तर पर किसान हित को सर्वोपरि रखा जाए।

डॉ. शरद गडाख ने अपने विचार व्यक्त करते हुए कहा : "कृषि विश्वविद्यालय सदैव किसानों के लिए खुला है। किसानों की समृद्धि ही हमारा ध्येय है। इसके लिए निरंतर नई किस्में, तकनीकें और शोध विकसित किए जा रहे हैं ताकि इनका लाभ सीधे किसानों तक पहुँचे।"

नवराष्ट्र
www.navarashtra.com

# तंत्रज्ञानातून शेतीला बळ

## ३६ यंत्रसामग्री शेतकऱ्यांच्या सेवेत

## महिलांसाठी मिळणार घरबसल्या रोजगार



कोंढाळी, वार्ताहर. विदर्भातील युवा शेतकरी व बेरोजगार युवकांना तसेच महिलांना स्वावलंबी बनविण्यासाठी कृषी विद्यापीठाने विकसित केलेले तंत्रज्ञान व यंत्रसामग्री बाजार समित्यांच्या माध्यमातून थेट शेतकऱ्यांपर्यंत पोहोचवली पाहिजे, असे आवाहन वसंतराव नाईक स्वावलंबन मिशनचे अध्यक्ष अ‍ॅड. निलेश हेलोंडे पाटील यांनी केले.

डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ, अकोला यांनी तब्बल ३६ प्रकारच्या यंत्रसामग्री शेतकऱ्यांसाठी विकसित केल्या आहेत. यात मिनी दाल मिल संयंत्र, मिरची बीज निष्कासन यंत्र, बाष्पीय शीतक साठवण गृह, संत्रा/मोसंबी साठवण सुविधा, गव्हांकूर भुकटी यंत्र, पशुखाद्य निर्मिती यंत्र, सीताफळ गरापासून बीज वेगळे करण्याचे यंत्र, फळ प्रतवारी यंत्र अशा अनेक यंत्रांचा समावेश आहे. या तंत्रज्ञानाचा वापर केल्यास शेती उत्पादनक्षमता वाढेल, खर्च कमी होईल आणि बेरोजगार युवक व महिलांना रोजगाराच्या नव्या संधी उपलब्ध होतील. बैठकीत शेतकऱ्यांनीही कृषी बाजार समित्यांनी या तंत्रज्ञानाचे शिवार फेऱ्या व प्रात्यक्षिके आयोजित करावीत, अशी मागणी केली. महिलांना घरबसल्या धान्य व फळभाजी प्रक्रिया, पशुखाद्य निर्मिती यांसारख्या उपक्रमातून नियमित उत्पन्न मिळेल आणि त्यांचे सामाजिक-आर्थिक सक्षमीकरण होईल, असा विश्वास व्यक्त करण्यात आला. या प्रसंगी प. कृ. वि. चे कुलगुरू डॉ. शरद गडाख यांनी "शेतकरी वाचला तरच देश वाचेल" या भूमिकेतून संशोधन थेट गावोगावी पोहोचवण्याचा संदेश दिला. तसेच विद्यापीठाचे दार शेतकऱ्यांसाठी सदैव खुले असल्याचे ते म्हणाले.

Orange City Metro Edition
Sep 06, 2025 Page No. 4
Powered by: Navarashtra.com

दैनिक
जनप्रभात
सामाजिक परिवर्तनाचा बुलंद आवाज



# युवा शेतकऱ्यांचे स्वयंरोजगारासाठी कृषी विद्यापीठाचे तंत्रज्ञानाचा उपयोग केला जावा : एड. निलेश हेलोंडे पाटील

काटोल/प्रशांत पवार



विदर्भातील युवा शेतकरी व बेरोजगार युवकांना तसेच महिलांना आर्थिक व सामाजिकदृष्ट्या रोजगारक्षम बनविण्यासाठी कृषी विद्यापीठाने विकसित केलेले तंत्रज्ञान बाजार समित्यांच्या माध्यमातून थेट शेतकऱ्यांपर्यंत पोहोचविले पाहिजे, असे आवाहन वसंतराव नाईक स्वावलंबन मिशनचे अध्यक्ष(राज्य मंत्री दर्जा)एड. निलेश हेलोंडे पाटील यांनी केले.

डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ, अकोला यांनी शेतकऱ्यांसाठी एकूण ३६ प्रकारचे तंत्रज्ञान व यंत्रसामग्री विकसित केली आहे. यात -

कचरा शुष्कक,मिनी दाल मिल संयंत्र,मिरची बीज निष्कासन यंत्र,बाष्पीय शीतक साठवण गृह,संत्रा /मोसंबी व फळभाज्या साठवण सुविधा,सीताफळगरापासून बीज वेगळे करण्याचे यंत्र,गव्हांकूर भुकटी यंत्र,पशुखाद्य निर्मिती यंत्र,फळ प्रतवारी यंत्र,तात्पुरते धान्य झाकण्याचे आवरण,सोयाबीन मधील कचरा-खडे निष्कासन यंत्र,हिरव्या शेंगा सोलणी यंत्र,हिरवा हरभरा गाठे तोंडणी यंत्र,अशी अनेक यंत्रसामग्री उपलब्ध करून दिली आहे. या तंत्रज्ञानाचा वापर केल्यास शेतकऱ्यांच्या उत्पादनक्षमतेत वाढ होईल, तर बेरोजगार युवकांना व महिला शेतकऱ्यांना स्वावलंबनाची नवी वाट खुली होईल.

**महिलांना सक्षम करण्यावर भर**

बैठकीत उपस्थित शेतकऱ्यांनीही मत मांडताना सांगितले की, बाजार समित्यांनी या यंत्रसामग्री व तंत्रज्ञानाच्या जनजागृतीसाठी शिवार फेरी व प्रत्यक्ष प्रात्यक्षिके आयोजित करावीत. यामुळे महिलांना घरबसल्या फळभाजी प्रक्रिया, धान्य प्रक्रिया, पशुखाद्य निर्मिती यांसारख्या कामांमधून नियमित उत्पन्न मिळू शकेल. परिणामी त्यांचे आर्थिक व सामाजिक सक्षमीकरण होईल.

**कृषी संशोधन गावोगावी पोहोचविणे हाच उपाय**

शेतकऱ्यांचे आत्महत्या संकट, उत्पादनवाढीतील अडथळे यावर कायमस्वरूपी उपाय म्हणजे कृषी विद्यापीठाचे संशोधन थेट शेतकऱ्यांपर्यंत पोहोचविणे आणि त्यांनी ते प्रत्यक्ष अंगीकारणे, असा ठाम संदेश या बैठकीतून देण्यात आला.

एड. निलेश हेलोंडे पाटील यांनी या प्रसंगी उपस्थित प कृ वि चे कुलगुरू डॉ शरद गडाख व येथील सर्व कृषी शास्त्रज्ञ, कृषी वैज्ञानिकांना आग्रह पुर्ण आवाहन केले की

'शेतकरी वाचला तरच देश वाचेल!' या करिता आपण आपल्या स्तरावर योगदान करावे असे आवाहन केले. प.कृ.वि. शेतकऱ्यांचे माहिती व मार्गदर्शनासाठी सदैव खुले. शेतकऱ्यांची शेती व शेतकरी समृद्ध व्हावा, या करिता प.कृ.वि. चे मार्फत सदैव नव नवीन वाण नव नवीन तंत्रज्ञान विकसित केले जाते. पण.कृ.वि. चे शात्रज्ञ, वैज्ञानिकांचे नव नवीन शोध याचा फायदा शेतकऱ्यांना मिळावा या करीता माहिती उपलब्ध करून देण्यासाठी शेतकर्यांना माहिती उपलब्ध करून देण्यासाठी प.कृ.वि. चे दारे सदैव खुले आहेत. असे मत प.कृ.वि.चे कुलगुरू डॉ शरद गडाख यांनी मांडले.

मराठी महाराष्ट्राचा बुलंद आवाज
महासागर

# शेतकऱ्यांनी स्वयंरोजगारासाठी कृषी विद्यापीठाच्या तंत्रज्ञानाचा उपयोग करावा : ॲड. निलेश हेलोंडे पाटील

■ महासागर प्रतिनिधी

काटोल, दि. ८ :

विदर्भातील युवा शेतकरी व बेरोजगार युवकांना तसेच महिलांना आर्थिक व सामाजिकदृष्ट्या रोजगारक्षम बनविण्यासाठी कृषी विद्यापीठाने विकसित केलेले तंत्रज्ञान बाजार समित्यांच्या माध्यमातून थेट शेतकऱ्यांपर्यंत पोहोचविले पाहिजे, असे आवाहन वसंतराव नाईक स्वावलंबन मिशनचे अध्यक्ष(राज्य मंत्री दर्जा) ॲड. निलेश हेलोंडे पाटील यांनी केले.

डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ, अकोला यांनी शेतकऱ्यांसाठी एकूण ३६ प्रकारचे तंत्रज्ञान व यंत्रसामग्री विकसित केली आहे. यात कचरा शुष्कक,मिनी दाल मिल संयंत्र, मिरची बीज निष्कासन यंत्र,बाष्पीय शीतक साठवण गृह,संत्रा /मोसंबी व फळभाज्या साठवण सुविधा,सीताफळ गरापासून बीज वेगळे करण्याचे यंत्र,गव्हांकूर भुकटी यंत्र, पशुखाद्य निर्मिती यंत्र,फळ प्रतवारी यंत्र, तात्पुरते धान्य झाकण्याचे आवरण, सोयाबीन मधील कचरा-खडे निष्कासन यंत्र, हिरव्या शेंगा सोलणी यंत्र, हिरवा



हरभरा गाठे तोंडणी यंत्र,अशी अनेक यंत्रसामग्री उपलब्ध करून दिली आहे. या तंत्रज्ञानाचा वापर केल्यास शेतकऱ्यांच्या उत्पादनक्षमतेत वाढ होईल, तर बेरोजगार युवकांना व महिला शेतकऱ्यांना स्वावलंबनाची नवी वाट खुली होईल.

बैठकीत उपस्थित शेतकऱ्यांनीही मत मांडताना सांगितले की, बाजार समित्यांनी या यंत्रसामग्री व तंत्रज्ञानाच्या जनजागृतीसाठी शिवार फेरी व प्रत्यक्ष प्रात्यक्षिके आयोजित करावीत. यामुळे महिलांना घरबसल्या फळभाजी प्रक्रिया, धान्य प्रक्रिया, पशुखाद्य निर्मिती यांसारख्या कामांमधून नियमित उत्पन्न मिळू शकेल. परिणामी त्यांचे आर्थिक व सामाजिक सक्षमीकरण होईल.

शेतकऱ्यांचे आत्महत्या संकट, उत्पादनवाढीतील अडथळे यावर कायमस्वरूपी उपाय म्हणजे कृषी विद्यापीठाचे संशोधन थेट शेतकऱ्यांपर्यंत पोहोचविणे आणि त्यांनी ते प्रत्यक्ष अंगीकारणे, असा ठाम संदेश या बैठकीतून देण्यात आला. ॲड. निलेश हेलोंडे पाटील यांनी या प्रसंगी उपस्थित पकृविचे कुलगुरू डॉ. शरद गडाख व येथील सर्व कृषी शास्त्रज्ञ, कृषी वैज्ञानिकांना आग्रह पुर्ण आवाहन केले की शेतकरी वाचला तरच देश वाचेल! या करिता आपण आपल्या स्तरावर योगदान करावे असे आवाहन केले. प.कृ.वि. शेतकऱ्यांचे माहिती व मार्गदर्शनासाठी सदैव खुले. शेतकऱ्यांची शेती व शेतकरी समृद्ध व्हावा, या करिता प.कृ.वि. चे मार्फत सदैव नव नवीन वाण नव नवीन तंत्रज्ञान विकसित केले जाते. पण.कृ.वि. चे शात्रज्ञ, वैज्ञानिकांचे नव नवीन शोध याचा फायदा शेतकऱ्यांना मिळावा या करीता माहिती उपलब्ध करून देण्यासाठी शेतकर्यांना माहिती उपलब्ध करून देण्यासाठी प.कृ.वि. चे दारे सदैव खुले आहेत. असे मत प.कृ.वि.चे कुलगुरू डॉ शरद गडाख यांनी मांडले.

दिनांक ०९.०९.२०२५ रोजी मंत्रालय, मुबई येथे मा. ना. श्री. मकरंदजी पाटील साहेब, मंत्री मदत व पुनर्वसन विभाग यांना मिशनकडून करण्यात आलेल्या कामाबाबतची माहिती पुस्तिका देण्यात आली



दिनांक ११.०९.२०२५ रोजी जलालखेडा, ता. नरखेड, जि. नागपूर येथे पशुवैद्यकीय दवाखान्याचे परीसरातील जमीनीवर चारा लागवडीचे कार्यक्रमास उपस्थित







तरुण भारत
Nagpur Pages | 2025-09-12 | Page-2
epaper.tarunbharat.net

# जलालखेड्यात ऑस्ट्रेलियन गवताचा प्रयोग

**पवन कळंबे**

◆ **जलालखेडा, ११ सप्टेंबर**

गोधनापासून अधिकाधिक दूध उत्पादन हवे असल्यास त्यांना सकस आहार देणे गरजेचे असते. गाईच्या वजनानुसार तिच्या चाऱ्याचे गणित असते. पण अनेकांनी चुकीच्या गोष्टी अंगिकारल्याने चारा टंचाईचा सामना गावखेड्यातील जनावरांना करावा लागत आहे. या स्थितीत त्यांना ऑस्ट्रेलियन गवताचा आता आधार मिळणार आहे. हो, तसाच नवखा प्रयोग नरखेड तालुक्यातील जलालखेडासह काही गावांमध्ये ऑस्ट्रेलियन नेपियर, डीएचएन १० आणि ०६ जातीचे कुरण लागवड सुरू करण्यात आली आहे. जनावरांना वर्षभर हिरवा चारा मिळाल्यास त्यांच्यातील उत्पादनक्षमता वाढत जाते. त्यांना पौष्टिक चारा मिळत असल्याने दूधाचा दर्जाही उंचावतो.



हाच दूरगामी विचार करून कै. वसंतराव नाईक शेती स्वावलंबन मिशनने पुढाकार घेत जनावरांना मुबलक चारा मिळावा म्हणून हा उपक्रम हाती घेतला असल्याची माहिती ॲड. नीलेश हेलोंडे यांनी दिली. यावेळी शेतकऱ्यांच्या शेतात जाऊन प्रत्यक्ष लागवड कशी करायची यावर मार्गदर्शन करण्यात आले. याप्रसंगी दिलेश ठाकरे, अक्षय इरखडे, मयूर सोनोने, प्रतीक्षा दंढारे, डॉ. अश्विनी कांबळे, तहसीलदार उमेश खोडगे, वसंत गोरे, डॉ. स्वप्निल रेवतकर, डॉ. प्रवीण सारडे, अनिल इंगोले, भूषण बढीये, मुस्ताक बानवा, शब्बीर शहा बानवा, शाहरुख मिर्झा, गजानन नाडेकर, मोहित इंगोले, हर्षल बोकडे, पंकज मेहेत्रे उपस्थित होते. ऑस्ट्रेलियन नेपिअर या गवताची वाढ जलद होते अन् जनावरांना ते तातडीने उपलब्ध होते.

त्यातील पोषक मूल्ये पाहता त्याचा लाभ जनावरांना दूरगामी होतो, हे प्रयोगाअंती सिद्ध झाले आहे. म्हणूनच आम्ही शेतकऱ्यांसाठी हा प्रयोग करीत असल्याची भूमिका दिलेश ठाकरे यांनी मांडली.

◀(तभा वृत्तसेवा)

Powered by Bharati Web

दिनांक ११.०९.२०२५ रोजी धानोरा कोकाटे, ता. अमरावती येथे मृतक आशिष विजय गावंडे शेतकरी आत्महत्या प्रकरणात कुटूंबियांची भेट





दिनांक ११.०९.२०२५ रोजी पोहरा पूर्णा, ता. भातकुली येथे मृतक नितीन अशोक बोबडे शेतकरी आत्महत्या प्रकरणात कुटूंबियांची भेट





# शेती स्वालंबन मिशनच्या अध्यक्षांची पोहरापुर्णा येथे सांत्वनपर भेट

**वरुड केसरी/अमरावती(प्रतिनिधी)**–

कै. वसंतराव नाईक शेती स्वालंबन मिशनचे अध्यक्ष ॲड. निलेश हेलोंडे पाटील यांनी पोहरापुर्णा येथे आत्महत्या केलेल्या कुटुंबियांना भेट दिली.ॲड. हेलोंडे पाटील यांनी गुरूवार, दि. ११ सप्टेंबर रोजी पोहरापुर्णा, ता. भातकुली येथील नितीन बोबडे या आत्महत्या केलेल्या शेतकरी कुटुंबास सांत्वनपर भेट दिली. यावेळी स्वीय सहाय्यक मनोज कापडे, भातकुलीचे तहसीलदार डॉ. अजितकुमार येळे आदी उपस्थित होते.ॲड. हेलोंडे पाटील यांनी आत्महत्याग्रस्त कुटुंबीयांची आत्मियतेने चौकशी केली. मृतक नितीन बोबडे यांचा मुलगा सार्थक बोबडे आणि मुलगी धनश्री बोबडे यांच्या शिक्षणाबाबत विचारपूस केली. तसेच मृतकाची पत्नी रुपाली बोबडे यांना घरगुती व्यवसायाचे प्रशिक्षण, तसेच शासकीय योजनांचा लाभ देण्याबाबत सांगितले.



नवभारत
www.navbharatlive.com

# बोबड़े परिवार को मिलेगी मदद

## मुलाकात कर एड. नीलेश हेलांडे ने दिया आश्वासन

**अमरावती, ब्यूरो.** भातकुली तहसील के मौजा पोहरा पूर्णा गांव में रहने वाले किसान नितिन अशोकराव बोबडे ने 18 जुलाई 2024 को लगातार फसलें खराब होने, कर्ज का बढ़ता बोझ, प्राकृतिक आपदाएं और बच्चों की शिक्षा को लेकर चल रही चिंता के चलते विष पीकर आत्महत्या कर ली थी. वसंतराव नाईक शेती स्वावलंबन मिशन के अध्यक्ष तथा राज्य मंत्री दर्जा प्राप्त एड. नीलेश हेलांडे पाटिल ने पोहरा पूर्णा गांव का दौरा किया. उन्होंने पीड़ित परिवार से मुलाकात कर संवेदना प्रकट की और सरकार की ओर से हरसंभव सहायता दिलाने का आश्वासन दिया.

**आर्थिक सहायता देने के निर्देश :** मृतक किसान अशोक बोबडे के पीछे पत्नी, एक बेटा और एक बेटी का परिवार है. वर्तमान में उनकी पत्नी रूपाली नितिन बोबडे मजदूरी कर परिवार का भरण-पोषण कर रही हैं. एड. हेलांडे बच्चों की शिक्षा के लिए तुरंत आर्थिक सहायता मुहैया कराने हेतु संबंधित अधिकारियों को आवश्यक निर्देश भी दिए. इस अवसर पर भातकुली तहसीलदार डॉ. अजीतकुमार येडे, जनसंपर्क अधिकारी प्रमोद कापडे, गट विकास अधिकारी तुषार दांडगे, सहायक गट विकास अधिकारी प्रवीण वानखडे, ग्रामविकास अधिकारी युवराज जाधव, ग्राम राजस्व अधिकारी सारिका सोलंके, कृषि सहायिका सोनाली पाटेकर, सरपंच गजानन लांजेवार, पुलिस पाटिल जयश्री बोरकर, उपसरपंच संदीप बोबडे सहित ग्रामपंचायत सदस्य व अन्य विभागों के अधिकारी उपस्थित थे.



### आज व कल चिखलदरा में

13 सितंबर को दोपहर 3 बजे चिखलदरा स्थित पंचायत समिति सभागृह में 'उमेद' महिला आर्थिक विकास महामंडल द्वारा मोथा गांव में खवा (मावा) निर्माण करने वाले बचत गट की सभा तथा 14 सितंबर को सुबह 11 बजे दूध उत्पादक और स्ट्रॉबेरी उत्पादक किसानों की सभा को एड. पाटिल संबोधित करेंगे.

# शेती स्वालंबन मिशनच्या अध्यक्षांची पोहरापुर्णा येथे सांत्वनपर भेट



**अमरावती/प्रतिनिधीः-** कै.वसंतराव नाईक शेती स्वालंबन मिशनचे अध्यक्ष ॲड. हेलोंडे पाटील यांनी गुरूवार, दि. ११ सप्टेंबर रोजी पोहरापुर्णा, ता. भातकुली येथील नितीन बोबडे या आत्महत्या केलेल्या शेतकरी कुटुंबास सांत्वनपर भेट दिली. यावेळी स्वीय सहाय्यक मनोज कापडे, भातकुलीचे तहसीलदार डॉ. अजितकुमार येळे आदी उपस्थित होते.

ॲड. हेलोंडे पाटील यांनी आत्महत्याग्रस्त कुटुंबीयांची आत्मियतेने चौकशी केली. मृतक नितीन बोबडे यांचा मुलगा सार्थक बोबडे आणि मुलगी धनश्री बोबडे यांच्या शिक्षणाबाबत विचारपूस केली. तसेच मृतकाची पत्नी रुपाली बोबडे यांना घरगुती व्यवसायाचे प्रशिक्षण, तसेच शासकीय योजनांचा लाभ देण्याबाबत सांगितले.

**दिनांक १३.०९.२०२५ रोजी मोथा, ता. चिखलदरा येथील खवा निर्मीती करणा-या महिला दुध उत्पादक बचत गटाची सभेस उपस्थित**






दिनांक १४.०९.२०२५ रोजी चिखलदरा येथे दुध व स्ट्रॉबेरी उत्पादक शेतक-यांच्या बैठकीस उपस्थित






दिनांक १४.०९.२०२५ रोजी चिखलदरा येथे कॉफी व मोती उत्पादक शेतक-यांच्या बांधावर भेट व पाहणी









दिनांक १४.०९.२०२५ रोजी श्री. संतोष शेलार, मुख्य अभियंता, राष्ट्रीय महामार्ग यांच्यासोबत राष्ट्रीय महामार्गावर शेतकऱ्यांसाठी फळ विक्री केंद्र व वरूड मोर्शी, सिमेंट रस्त्यामधील भेगा भरण्याबाबत बैठक व चर्चा



**दिनांक १६.०९.२०२५ रोजी शिवनी, ता. नांदगांव खंडेश्वर येथे मृतक योगेश मछिन्द्र नेरकर शेतकरी आत्महत्याग्रस्त कुटूंबास भेट**




# आत्महत्याग्रस्त कुटुंबाला हेलोंडे पाटील यांची भेट

अमरावती : कै. वसंतराव नाईक शेती स्वावलंबन मिशनचे अध्यक्ष अॅड. नीलेश हेलोंडे पाटील यांनी शिवणी रसुलापूर (ता. नांदगाव खंडेश्वर) येथे आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंब सुफला योगेश नेरकर यांच्या घरी भेट दिली.

यावेळी त्यांनी कौटुंबिक माहिती घेऊन शासकीय योजनेचा लाभ घेतला असल्याबाबत माहिती घेतली. नेरकर कुटुंबाला उर्वरित योजनांचा लाभ देण्याबाबत विभाग प्रमुखांना सूचना दिल्या. तसेच शिवनी, रसूलापूर येथील सोयाबीन पिकांची पाहणी करून शेतकऱ्यांच्या समस्या जाणून घेतल्या.

भेटी दरम्यान तहसीलदार अश्विनी जाधव, गट विकास अधिकारी डॉ. श्रीमती. स्नेहल शेलार, तालुका कृषी अधिकारी विकास पाटील, महिला व बालविकास अधिकारी श्री. गलफड, ग्राम महसूल अधिकारी अश्विनी उईके, वैभव लाड, कृषी सहायक पुरुषोत्तम वंजारी, सरपंच शशिकला खडसे, चंद्रशेखर गावंडे, गजानन देशमुख, पोलिस पाटील प्रवीण इरतकर, चंद्रशेखर गावंडे उपस्थित होते.



**अमरावती : (कै) वसंतराव नाईक शेती स्वावलंबन मिशनचे अध्यक्ष नीलेश हेलोंडे पाटील यांनी नेरकर कुटुंबीयांची भेट घेतली.**

**दिनांक १६.०९.२०२५ रोजी शिवनी, ता. नांदगांव खंडेश्वर येथे अतिवृष्टीमुळे झालेल्या नुकसानीची पाहणी करताना अध्यक्ष महोदय**





**दिनांक १८.०९.२०२५ रोजी विश्रामगृह, माहूर जि. नांदेड येथे** तहसिलदार, गटविकास अधिकारी, तालुका कृषि अधिकारी, बालविकास प्रकल्प अधिकारी यांच्या समवेत माहूर तालुक्यातील शेतकरी आत्महत्या व शासकीय जमिनीवर चारा लागवड यासंबंधी चर्चा






**दिनांक १८.०९.२०२५ रोजी पाडसा, ता. माहूर, जि. नांदेड येथे मृतक तुळशीराम शेवाळे आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबास भेट**




देशोन्नती

# शेती स्वावलंबन मिशनचे हेलोंडे यांनी घेतली आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबाची भेट

देशोन्नती वृत्तसंकलन



**माहूर** : कै. वसंतराव नाईक शेती स्वावलंबन मिशनचे अध्यक्ष राज्यमंत्री दर्जाचे निलेश हेलोंडे पाटील हे १८ रोजी माहुर तालुक्याच्या नियोजीत दौऱ्यावर होते त्यांनी तालुक्यातील मौजे पडसा येथील आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबाची प्रत्यक्ष भेट घेऊन चर्चा केली. या वेळी त्यांनी शासन आपल्या सोबत आहे, असाही धीर या वेळी कुटूंबीयांना दिला. तहसीलदार अभिजित जगताप यांच्या सह अन्य अधिकारी उपस्थित होते.

प्रशासन आपल्या दारी या उपक्रमांतर्गत ॲड. निलेश हेलोंडे पाटील यांच्या अध्यक्षतेखाली माहूर येथे १८ सप्टेंबर रोजी दौऱ्या नंतर तालूकास्तरीय विभाग प्रमुखांची विशेष बैठक घेण्यात आली. या बैठकीत विविध शासकीय योजना व उपक्रमांची अंमलबजावणी प्रभावीपणे करून शेतकऱ्यांचा उद्धार व्हावा, यासाठी त्यांनी सर्व विभाग प्रमुखांना समन्वयाने काम करण्याच्या सूचना दिल्या. बैठकीत विशेष सहाय्य योजना, अन्नधान्य पुरवठा योजना, तसेच महात्मा गांधी राष्ट्रीय रोजगार हमी योजने अंतर्गत सुरू असलेल्या वैयक्तिक व सार्वजनिक कामांची सविस्तर आढावा घेण्यात आला.

या बैठकीस तहसीलदार अभिजीत जगताप, गट विकास अधिकारी ज्ञानेश्वर टाकरस, आय.सी.डी. सचिन ढवळे, संतोष दांडेगावकर, संदीप कदम, जी. व्ही. पत्तेवार, चंद्रकांत निंमोड यांच्यासह तहसील सहाय्यक कार्यक्रमाधिकारी बालाजी चव्हाण, संदेश जाधव, सौ. नयना जाधव यांच्यासह अन्य कर्मचारी अधिकारी उपस्थित होते. (ता.प्र.)

Nanded Edition
Sep 20, 2025 Page No. 7
Powered by: erelego.com

**दिनांक १९.०९.२०२५ रोजी तहसील कार्यालय किनवट, जि. नांदेड  येथे शेतकरी आत्महत्याग्रस्त कुटुंबांना योजनाचा लाभ देणे तसेच आदिवासी विकास अंतर्गत योजनांचा लाभ चारा लागवड या विषयावरील आढावा बैठक**






**दिनांक १९.०९.२०२५ रोजी मारेगाव (व), ता. किनवट, जि. नांदेड येथे मृतक राजू किसन मोरे आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबास भेट**






**दिनांक १९.०९.२०२५ रोजी कनकवाडी, ता. किनवट, जि. नांदेड येथे मृतक नागनाथ रामा गाडगे आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबास भेट**






स्थापना १९३९
प्रचंड खपाचे एकमेव नि:पक्ष व निर्भीड दैनिक
पुढारी
www.pudhari.com

### शेतकऱ्यांच्या हक्कांसाठी शासन कटिबद्ध

# आत्महत्याग्रस्त कुटुंबीयांना ॲड. हेलोंडे यांचा दिलासा



**किनवट : कनकवाडी येथे शेती स्वावलंबन मिशनचे अध्यक्ष ॲड. नीलेश हेलोंडे पाटील (राज्यमंत्री दर्जा) यांनी आत्महत्याग्रस्त कुटुंबीयांना भेट देऊन दिलासा दिला. यावेळी तहसीलदार डॉ. शारदा चोंडेकर, गटविकास अधिकारी ज्ञानेश्वर टाकरस व शासकीय कर्मचारी उपस्थित होते.**

**किनवट, पुढारी वृत्तसेवा :** सातत्याने आलेल्या नापिकी व कर्जाच्या विळख्यात सापडून जीव गमावणाऱ्या शेतकऱ्यांच्या कुटुंबीयांना शासन एकटे सोडणार नाही, असा विश्वास कै. वसंतराव नाईक शेती स्वावलंबन मिशनचे अध्यक्ष व राज्यमंत्री दर्जाचे ॲड. नीलेश हेलोंडे पाटील यांनी दिला. १९ सप्टेंबर रोजी तालुक्यातील दौऱ्यात त्यांनी कनकवाडी व मारेगाव येथील आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या कुटुंबांना भेटून प्रत्यक्ष संवाद साधला. या वेळी त्यांनी शासन त्यांच्या सोबत असल्याचा दिलासा देत भावनिक पाठबळ दिले. तहसीलदार डॉ. शारदा चोंडेकर यांच्यासह संबंधित अधिकारीही यावेळी उपस्थित होते.

दरम्यान, ''प्रशासन आपल्या दारी'' या उपक्रमांतर्गत हेलोंडे पाटील यांच्या अध्यक्षतेखाली किनवट येथे तालुकास्तरीय विभागप्रमुखांची विशेष बैठक घेण्यात आली. या बैठकीत शेतकऱ्यांच्या उद्धारासाठी विविध शासकीय योजनांची प्रभावी अंमलबजावणी करण्याचे निर्देश देण्यात आले. विशेष सहाय्य योजना, अन्नधान्य पुरवठा, महात्मा गांधी राष्ट्रीय रोजगार हमी योजनेखालील वैयक्तिक व सार्वजनिक कामांचा आढावा घेऊन सर्व विभागांनी समन्वयाने काम करावे, असे मार्गदर्शन हेलोंडे यांनी केले.

या बैठकीला तहसीलदार डॉ. शारदा चोंडेकर, गटविकास अधिकारी ज्ञानेश्वर टाकरस, तालुका कृषी अधिकारी चंद्रकांत निमोड, पशुसंवर्धन विभागाचे डॉ. उमेश धोंड, कृषी अधिकारी बालाजी शेनेवाड, श्रीनिवास दांडेगावकर, सहायक महसूल अधिकारी विजय सुरोशे, महसूल सहायक फिरोजखान पठाण यांच्यासह अन्य अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. बैठकीनंतर हेलोंडे पाटील यांनी आत्महत्या केलेले कनकवाडी येथील शेतकरी नागनाथ राम गाडगे आणि मारेगाव (वरचे) येथील शेतकरी राजू केशव मोरे यांच्या कुटुंबीयांच्या घरी भेट देऊन त्यांच्या दुःखात सहभागी झाले.

http://lokadesh.in RNI No.MAHAMAR/2007/20732 Visit Lokdesh's Social Media

लोकादेश Online Exclusive NEWS

Date :24/09/2025 Kinwat Dist. Nanded. संपादक : साजीद बडगुजर

# शेती स्वावलंबन मिशनचे हेलोंडे यांनी घेतली आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबाची भेट




**लोकादेश न्यूज,किनवट : कै.वसंतराव नाईक शेती स्वावलंबन मिशनचे अध्यक्ष व राज्यमंत्री दर्जाचे ॲड. निलेश हेलोंडे पाटील यांनी १८ सप्टेंबर रोजी किनवट तालुक्याच्या दौऱ्यातआत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबाची भेट घेऊन त्यांच्या दुःखात सहभागी होत धीर दिला. शासन आपल्या पाठीशी ठामपणे उभे आहे,असा विश्वास त्यांनी कुटुंबीयांना दिला.या वेळी तहसीलदार डॉ. शारदा चोंडेकर यांच्यासह अन्य अधिकारी उपस्थित होते.**

यानंतर प्रशासन आपल्या दारी या उपक्रमांतर्गत हेलोंडे पाटील यांच्या अध्यक्षतेखाली किनवट येथे तालुकास्तरीय विभागप्रमुखांची विशेष बैठक घेण्यात आली. बैठकीत विविध शासकीय योजना व उपक्रमांचा आढावा घेण्यात आला. शेतकऱ्यांचा सर्वांगीण उद्धार व्हावा यासाठी सर्व विभागांनी समन्वयाने काम करण्याच्या सूचना त्यांनी दिल्या. विशेष सहाय्य योजना, अन्नधान्य पुरवठा योजना, तसेच मनरेगा अंतर्गत सुरू असलेल्या वैयक्तिक व सार्वजनिक कामांचा सविस्तर आढावा या बैठकीत घेण्यात आला.

दौऱ्यात हेलोंडे पाटील यांनी मारेगाव (व) येथील राजु केशव मोरे आणि कनकवाडी येथील नागनाथ रामा गाडगे या आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबांना भेट देऊन सांत्वन केले.

या बैठकीस तहसीलदार डॉ. चोंडेकर यांच्यासह विविध विभागांचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

**दिनांक २२.०९.२०२५ रोजी विश्रामगृह चांदूर रेल्वे येथे तहसिलदार, गटविकास अधिकारी, तालुका कृषि अधिकारी, बालविकास प्रकल्प अधिकारी यांच्या समवेत तालुक्यातील शेतकरी आत्महत्या व शेतकरी योजनासंबंधी चर्चा**





दिनांक २२.०९.२०२५ रोजी धानोरा म्हाली, ता. चांदूर रेल्वे येथे मृतक निलेश बाबाराव मारबदे शेतकरी आत्महत्याग्रस्त कुटुंबास भेट





**दिनांक २३.०९.२०२५ रोजी अमरावती विभागातील आदिवासी जमातीमधील शेतक-यांकरीता असलेल्या योजनांबाबत आदिवासी विकास विभागाचे अधिकारी यांचे समवेत दालनामध्ये बैठक**



**दिनांक २३.०९.२०२५ रोजी मोथा, ता. चिखलदरा येथील खवा निर्मीते उद्‌योजक यांचेकरीता बाजारपेठ व कोल्ड स्टोअरेज तसेच MEDA मार्फत सौरउर्जा प्रकल्प उपलब्ध करुन देण्यासंबंधी अमरावती येथील उमेद व माविम चे अधिकारी यांचे समवेत दालनामध्ये बैठक**



दिनांक २४.०९.२०२५ रोजी अंबाडा (सो), ता. काटोल, जि. नागपूर येथे शासकीय गायरान जमीनीवर म.ग्रा.रो.ह.यो. अंतर्गत चारा लावगडीचे कार्यक्रमास उपस्थित






PostaReg.No.:AMT/RNP/533/2023-25 RNI.NO.MAHMAR/2022/83159

सांध्यदैनिक

# वरुड केसरी

संपादक : प्रविण वसंतराव सावरकर, मो. ९८६०७३६१४२ ■ वरुड ■ गुरुवार, २५ सप्टेंबर २०२५ ■ वर्ष ३ रे ■ अंक २०४ ■ पृष्ठ ६ ■ मूल्य ४ रु. सहसंपादक : निखील वावणे

# दुग्धक्रांतीचा मार्ग : शेतकऱ्यांसाठी चारा लागवड उपक्रम

## आत्महत्या-ग्रस्त कुटुंबांना आधार देण्याचे आश्वासन ह्न ॲड निलेश हेलोंडे



**वरुड केसरी : काटोल (प्रतिनिधी)-** शेतीसोबत दुग्ध व्यवसायाला चालना देण्यासाठी चाऱ्याची उपलब्धता हीच खरी किल्ली आहे. शासनाने ई-क्लॉस जमिनीवर हाती घेतलेल्या चारा लागवड उपक्रमामुळे पशुपालकांच्या उत्पन्नात वाढ होणार असून, ग्रामीण भागात दुग्धक्रांती घडू शकते, असे प्रतिपादन कै. वसंतराव नाईक शेती स्वावलंबन मिशनचे अध्यक्ष (राज्यमंत्री) ॲड. निलेश हेलोंडे पाटील यांनी केले.

२४ सप्टेंबर रोजी काटोल तालुक्यातील अंबाडा सोनक येथे दोन एकर शासकीय ई-क्लॉस जमिनीवर चारा लागवड करून या उपक्रमाचा शुभारंभ करण्यात आला. यावेळी ॲड. हेलोंडे यांनी प्रत्यक्ष मुहूर्तमेढ रोवून शेतकऱ्यांना मार्गदर्शन केले.

ते म्हणाले, या चाऱ्यापासून तयार होणाऱ्या थोब्यांचे वितरण शेतकऱ्यांना करण्यात येईल. दुधाचे उत्पादन वाढल्यास पशुपालकांचे जीवनमान सुधारेल. दुग्ध व्यवसाय हा शेतकऱ्यांसाठी आर्थिक स्थैर्याचा स्तंभ ठरू शकतो.


आत्महत्या-ग्रस्त शेतकरी कुटुंबांबाबत संवेदनशील भूमिका

हेलोंडे पाटील यांनी या प्रसंगी आत्महत्या-ग्रस्त शेतकरी कुटुंबांनाही थेट आश्वासन दिले. त्यांनी सांगितले की, स्वावलंबन मिशनच्या माध्यमातून अशा कुटुंबांना आधार देण्याचे काम आम्ही करत आहोत. चारा लागवड व दुग्ध व्यवसाय उपक्रमांमुळे शेतकऱ्यांना नवा आधार मिळेल. शेतकरी आत्महत्या थांबविण्यासाठी हा उपक्रम महत्वाचा टप्पा ठरेल.

या कार्यक्रमास तालुका कृषी अधिकारी जयंत कौटकर, मंडळ कृषी अधिकारी नितीन निगुट, उपकृषी अधिकारी निलेश बालपांडे, सहाय्यक कृषी अधिकारी दीपिका वाकद्कर व अमृता भिंगारे, सरपंच चंद्रशेखर गावंडे, हेमंत कावडकर (अध्यक्ष, संजय गांधी निराधार योजना), पुरुषोत्तम धोटे यांच्यासह ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. शेतकऱ्यांमध्ये आशा आणि आत्मनिर्भरतेचा नवा किरण निर्माण करणारा हा उपक्रम दुग्धक्रांतीकडे वाटचाल करणारा ठरू शकतो, असा विश्वास सर्वांनी व्यक्त केला.

**दिनांक २४.०९.२०२५ रोजी डॉ. पंजाबराव देशमुख विद्यापीठ अंतर्गत फळ संशोधन केंद्र काटोल, जि. नागपूर येथे चारा लागवड व संत्रा फळ गळती संदर्भात बैठक**



दिनांक २५.०९.२०२५ रोजी नागपूर येथे अमरावती व नागपूर विभागातील बाजार समिती पदाधिकारी यांना मराठवाड्यातील दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांसाठी मदतीचे आवाहन करताना मा. अध्यक्ष महोदय






## दिनांक २५.०९.२०२५ रोजी नागपूर येथे मराठवाड्यातील दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांसाठी मदत देण्यासंबंधी एम.आय.डि.सी. चे अधिकारी यांचे समवेत बैठकीस उपस्थित






डॉ.पंजाबराव देशमुख नैसर्गिक शेती मिशन अंतर्गत
वडसावित्री ऑरगॅनिक्स फार्मर्स प्रोड्युसर कं.लि.वरुड
Regd. No. U0150MH2024PTC435856

**सस्नेह निमंत्रण**

जैविक निविष्ठा संसाधन मार्गदर्शन व प्रशिक्षण केंद्र

**लोकार्पण सोहळा**

मा.श्री.श्रीमती ................................................

................................................ स.न.वि.वि.

स्थानिक पातळीवर तयार केलेले नैसर्गिक शेती निविष्ठा जसे की, जैविक खते आणि जैविक किटकनाशके तयार करून पुरविण्याकरीता तालुक्यात प्रथमच जैविक निविष्ठा संसाधन मार्गदर्शन व प्रशिक्षण केंद्र उभारण्यात आले आहे. या केंद्राचा लोकार्पण सोहळ्यास आपली उपस्थिती प्रार्थनिय आहे.

**कार्यक्रमाचे उद्घाटक**

मा.ॲड.श्री.निलेश केशवराव हेलोंडे पाटील
अध्यक्ष, (राज्यमंत्री दर्जा)
कै.वसंतराव नाईक शेती स्वावलंबन मिशन, महाराष्ट्र राज्य, अमरावती

**कार्यक्रमाचे अध्यक्ष**

मा.श्री.उमेशभाऊ यावलकर
आमदार, मोर्शी-वरूड विधानसभा क्षेत्र

**प्रमुख उपस्थिती**

मा.श्री. राहुलजी सातपुते
जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी, अमरावती

मा.कु.अर्चनाताई निस्ताने
प्रकल्प संचालक, आत्मा, अमरावती

मा.श्री.उज्वलजी आगरकर
उपविभागीय कृषि अधिकारी, मोर्शी

मा.श्री.रेहान मुजावर
तालुका कृषि अधिकारी, वरूड

❊ दिनांक : २६ सप्टेंबर २०२५, शुक्रवार ❊ वेळ : सकाळी ११.०० वाजता.
❊ स्थळ : स्व. दिलीपराव यावलकर यांचे शेत, मुलताई रोड, वरूड
(मौजा-वरूड, भाग-१, जोगनामाता मंदीर समोरील उजवीकडे जाणारा पांदन रस्ता)

**विनीत**

श्री.अनुराग दि.यावलकर, संचालक
श्री.आशिष प्र.गुडधे, सी.वो.
सौ.रेखा रा.भादे, संचालक
श्री.जगदीश प्र.राऊत, संचालक
श्री.हिराकांत जा.उईके, संचालक
श्री.सचिन आ.वाटाणे, संचालक
श्री.चंद्रशेखर शं. पाटणकर, प्रवर्तक
श्री.राजेंद्र ज. कराळे, प्रवर्तक
श्री.वैभव सु.टेकोडे, प्रवर्तक
श्री.राजु वि.कराळे, प्रवर्तक
श्री.घनश्याम ना.भोपती, प्रवर्तक

वडसावित्री ऑरगॅनिक्स फार्मर्स प्रोड्युसर कं. लि.वरूड


**वरुड केसरी**


# ॲड. निलेश हेलोंडे पाटील यांचा दौरा

वरुड केसरी : प्रतिनिधी अमरावती,

कै. वसंतराव नाईक शेती स्वावलंबन मिशनचे अध्यक्ष ॲड. निलेश हेलोंडे पाटील हे शुक्रवार, दि. २६ सप्टेंबर रोजी जिल्ह्याचा दौरा करणार आहेत.दौऱ्यानुसार, शुक्रवार, दि. २६ सप्टेंबर रोजी दुपारी १२ वाजता वरुड येथील वडसावित्री ऑरगॅनिक फार्मर्स प्रोड्युसर कंपनी लिमीटेड यांच्या जैविक निविष्ठा संसाधन केंद्राच्या उद्घाटन कार्यक्रमास उपस्थित राहतील. दुपारी ३ वाजता विभागीय आयुक्त कार्यालयातील मिशनच्या कार्यालयात उपस्थित राहतील. त्यानंतर सोईनुसार काटोलकडे प्रयाण करतील.

**दिनांक २६.०९.२०२५ रोजी वरुड, जि. अमरावती येथे डॉ. पंजाबराव देशमुख नैसर्गिक शेती मिशन अंतर्गत वडसावित्री ऑरगॅनिक फार्मर्स प्रोडयुसर कंपनी लिमीटेड यांच्या जैविक निविष्ठा संसाधन केंद्राच्या उद्घाटन कार्यक्रमास उपस्थित**







दिनांक २९.०९.२०२५ रोजी मराठवाडयातील शेतक-यांना मदत करण्यासंबंधी प्रादेशिक अधिकारी व कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ, अमरावती यांचे समेवत बैठक व चर्चा



